INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No. MH-659/13(N)
www.vmsindia.org

# आडवाटेचे ऐतिहासिक पर्यटन स्थळ – तळबीड, ता. कराड.


एस. जे. सकट[1] आणि एस. बी. झोडगे[2]
[1]वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड
[2]छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

सारांश –

अलीकडच्या दशकामध्ये पर्यटन एक मोठा उद्योग समूह म्हणून नावारूपास येत आहे व वेगाने पर्यटन क्षेत्राचा विकास होत आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये व देशाच्या उर्वरीत क्षेत्रामध्ये पर्यटनासाठी अनेक क्षेत्रे आहेत. नैसर्गिक पर्यटन, सामाजिक पर्यटन, ऐतिहासिक पर्यटन, आधुनिक, सांस्कृतिक व शैक्षणिक पर्यटन इ. पर्यटनाची अनेक स्थळे आहेत. पर्यटन विकासाचा योग्य आराखडा, पर्यटनासाठी पायाभूत पार्श्वभूमी, त्याचे नियोजन आणि सर्वात महत्वाचे म्हणजे विविध पर्यटन स्थळे पर्यटकांना आकर्षित करतील आणि यांतून प्रदेशांच्या, स्थळांच्या व समाजाच्या विकासाची दालने विकसीत होतील.

तळबीड हे कराड तालुक्यातील असेच एक आडवाटेवरचे दुर्लक्षित परंतू ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत वैभवशाली वारसा लाभलेले ठिकाण असून छत्रपती शिवाजी महाराजांचे अत्यंत विश्वासू सेनापती हंम्बीरराव मोहिते यांच्या समाधी स्थळाने पावन झालेले हे ठिकाण आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची ही सासरवाडी, व हंम्बीरराव माहिते हे महाराजांचे मेहूणे. परंतू रक्ताच्या नात्यापेक्षा स्वामी निष्ठा, स्वराज्याची काळजी आणि स्वाभिमान या गोष्टी ऐतिहासिक

परंपरेचा वारसा सांगणाऱ्या ठरतात. याची प्रचिती सरसेनापती हंम्बीरराव मोहिते यांच्या वर्तनातून दिशादर्शक ठरतात. अशा या ऐतिहासिक स्थळांना प्रकाशात आणण्याचे काम केले तर पर्यटकांना समृध्द इतिहास तर कळेलच परंतू पर्यटन विकासातील अनेक अज्ञात पैलू उघडे होतील.



प्रस्तुत शोधनिबंधाची खालील काही उद्यिष्टये आहेत –

अ.महाराष्ट्राच्या समृध्द व गौरवशाली इतिहासाची उजळणी करणे.

ब.आडवाटेवरच्या ऐतिहासिक समाधीची माहिती देणे.

क.नात्यांपेक्षा स्वामीनिष्ठा व स्वराज्याबद्दल आभिमान श्रेष्ठ असतो.

माहिती संकलन –

प्रस्तुत शोध निबंधासाठी एक दिवसीय प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षण करण्यात आले. या ऐतिहासिक स्थळाला प्रत्यक्ष भेट देवून आवश्यक ती माहिती मिळवण्यात आली. ग्रामपंचायत कार्यालयमधील उपलब्ध माहिती व श्री राम मंदिर मूर्ती स्थापना विशेषांक इ. मधून माहिती घेण्यात आली.

तळबीड – भौगोलिक स्थान व स्थिती –

तळबीड या गावचे निरपेक्ष स्थान 17$^0$ 20′ 18′′ उत्तर अक्षवृत्त ते 74$^0$ 6′ 37′′ पूर्व रेखावृत्तावर वसलेले आहे. तळबीड हे कराड तालुक्याच्या पश्चिमेला 11 कि. मी. अंतरावर व राष्ट्रीय महामार्ग नं. 4 पासून दक्षिणेला 3कि. मी. अंतरावर आहे. इ. स. 2001 च्या जनगणनेनुसार या गावाची लोकसंख्या 4600 इतकी आहे व 2011 च्या जनगणनेनुसार 4805 इतकी आहे. तसेच गावांत 755 एकूण कुटूंबे राहतात. या गावचे क्षेत्रफळ 1100 हेक्टर्स पर्यंत आहे. शेती हा या गावच्या लोकांचा मुख्य व्यवसाय आहे.

तळबीड दख्खनच्या पठारांवरील कराड तालुक्यातील कृष्णा नदीच्या खोऱ्यामध्ये वसलेले गांव आहे. समुद्रसपाटीपासून 2100 मीटर्स उंचीवर वसले आहे. उन्हाळ्यामध्ये येथील दिवसाचे तापमान 40$^0$ से. ग्रे. व रात्रीचे तापमान 30$^0$ सें.ग्रे. पर्यंत असते तर सापेक्ष आर्द्रता 30 टक्के पर्यंत असते. हिवाळ्यामध्ये दिवसाचे तापमान 24$^0$ सें.ग्रे. पर्यंत असते तर सापेक्ष आर्द्रता 30 टक्के पर्यंत असते. वार्षिक पर्जन्यमान 65 ते 70 से.मी. पर्यंत आढळते.

शेती हा व्यवसाय प्रामुख्याने केला जातो. येथील शेती क्षेत्रातून ऊस हे प्रमुख बागायती पीक घेतले जाते. याशिवाय सोयाबीन, भूईमूग, मका, तसेच इतर पालेभाज्यांचे उत्पादन घेतले जाते. या गावचे एकूण क्षेत्रफळ 1100 हेक्टर आहे. त्यापैकी 400 हेक्टर वनक्षेत्राखाली, 16 हेक्टर गायरानसाठी तर 531 हेक्टर जमीन तासवडे एम.आय.डी.सी. खाली गेली आहे.

या गावातील साक्षरतेचे प्रमाण येथील लोकसंख्येच्या मानाने समाधानकारक आहे. 75 ते 80 टक्के येथील साक्षरतेचे प्रमाण आहे. तसेच 147 कुटूंबे दारिद्रय रेषेखाली आहेत. तळबीड या गावातील लोक देशसेवेसाठी आर्मी मध्ये दाखल झालेले आहेत. त्यामुळे आर्मीवाल्यांचे गांव म्हणून ओळखले जाते.

संशोधन पध्दती –

तळबीड गावच्या ऐतिहासिक व सांस्कृतीक पार्श्वभूमीच्या शोधनिबंधासाठी प्राथमिक व दुय्यम माहिती गोळा करण्यात आली. प्राथमिक माहिती स्थानिक ग्रामस्थांच्या प्रश्नोत्तर स्वरूपांत मुलाखत घेवून मिळवण्यात आली. तसेच दुय्यम माहिती सातारा जिल्हा गॅझेटियर, सातारा जिल्हा स्थलनिर्देशांक नकाशा, इ. माहिती स्त्रोतांचा वापर करण्यात आला.

ऐतिहासिक पार्श्वभूमी –

महाराष्ट्राच्या समृध्द व गौरवशाली इतिहासाची उजळणी करणे आवश्यक आहे. कारण या पार्श्वभूमीकडे आपण एक आदर्श म्हणून पाहत असतो.

“ विक्रम–वैराग्य एक जागी नांदती
परिपटका भगवा झेंडाही डोलती
धर्मराजकारण समवेत चालती
शक्ती मुक्ती एकवटूनी कार्य सांधिती
पसरे किर्ती अशी विस्मया हा
प्रिय आमुचा एक महाराष्ट्र देश हा ।।”

महाराष्ट्राच्या भूमीला ऐतिहासिक, सांस्कृतीक परंपरा लाभलेली आहे. ही भूमी स्वातंत्र वीरांची, संतांची, महात्म्यांची, बलवंतांची व थोर सुपुत्रांची खाण आहे. याठिकाणी न्यायप्रिय आदर्श शिवशाही निर्माण झाली. पेशव्यांनी अटकेपार झेंडे लावले. स्वराज्य कसे असावे? राज्यकर्ते कसे असावेत? याबद्दल एक आदर्श घालून दिला आहे.

तळबीड हे एक महत्त्वाचे ऐतिहासिक परंतू प्रसिध्दीस न आलेले गांव आहे. या गावाला ऐतिहासिक व सांस्कृतीक पार्श्वभूमी मिळालेली आहे. या पार्श्वभूमीचा पर्यटनाच्या माध्यमातून गावच्या आर्थिक विकासासाठी विकास करून घेता येईल या गावामध्ये शिवाजीमहाराजांचे सहावे सरसेनापती हंबीरराव बाजी मोहिते यांची समाधी आहे. माजी पर्यटन मंत्री विजयसिंह मोहिते–पाटील यांची सरसेनापतींच्या समाधीस्थळास तीर्थक्षेत्र विकास निधीतून 52 लाखांचा निधी मंजूर करून समाधीस्थळाची दुरूस्ती करून घेतली आहे. समाधी स्थळांवर मेघडंबरी समाधी बांधण्यात आली आहे. तसेच या परिसरांमध्ये सुशोभिकरण करण्यात आले आहे. तसेच वसंतगडावर येणाऱ्या पर्यटकांसाठी पायथ्याशी भक्त निवासही बांधण्यात आले आहे.

सरसेनापतींची जन्मतारीख निश्चित सांगता येतनाही. परंतू वाईच्या युध्दावेळी सर्जाखान

बरोबर लढताना ऑक्टोबर 1687 मध्ये त्यांना वीरमरण आले.


तळबीड गावच्या नैऋतेस जवळच वसंतगड आहे. याची समुद्रसपाटीपासूनची उंची 2900 मीटर्स पर्यंत आहे. अतिशय तीव्र उताराच्या डोंगररांगामध्ये महाराजांच्या कालावधीत हा गड बांधण्यात आला. गडाला चारीबाजूंनी दगडी तटबंदी व बुरूज आहेत. गडावर चंद्रसेनेचे मंदिर (शूर्पणकेचा मुलगा व रावणाचा भाचा ) आहे. सूर्यदेवतेची उपासना करत असतांना लक्ष्मणाच्या हातून कळकाच्या बेटामध्ये यांस मरण आले होते. तसेच गडावर एकूण लहान मोठी सात पाण्याची तळी आहेत. मोकाट फिरणाऱ्या खिलारी व इतर जातीच्या गाई व बैलांचा कळप आहे. या कळपांमध्ये एक हजारपर्यंत जनावरांची संख्या आहे. ही मोकाट जनावरे गडांवर येणाऱ्या पर्यटकांसाठी मुख्य आकर्षण बनण्याची शक्यता आहे. याशिवाय तलावांच्या सभोवती काटेरी व खुरट्या तसेच औषधी वनस्पती आहेत. वसंतगडावरून आजूबाजूच्या परिसरांवर नजर टाकल्यास अतिशय सुंदर परिसर दिसतो.

धार्मिक व सांस्कृतीक पार्श्वभूमी –

श्रीरामचंद्राचा पदस्पर्श या भूमीला झाला आहे. तसेच साधूसंतांच्या कालावधीमध्ये संत रामदासही याठिकाणी वास्तव्यांस होते. त्यांनीच तळबीड येथे श्री रामचंद्राची मुर्ती स्थापना केली होती. इ.स. 1600 मध्ये साधूसंतानी या परिसरामध्ये वास्तव्य करून, तपश्चर्या करून हा परिसर पवित्र केलेला आहे. रामदास कालीन प्रभूरामचंद्राचे मंदिर येथील एक जागृत देवस्थान आहे. मोडकळीस आलेले श्रीराम मंदिर तळबीडचे सुपुत्र साईकिरण बाबा यांनी बांधण्याचा निश्चय केला. बाबांनी श्रीराम मंदिराबरोबर जोतिबा मंदिर, साईबाबा मंदिर बांधून त्यांची मूर्तीस्थापना देखील केली आहे. तळबीड येथील श्रीराम मंदिर बांधकामासाठी एकूण 2.5 कोटी खर्च करण्यात आला आहे. श्री राम , लक्ष्मण , माता सीता , हनुमान व दत्तगुरू यांच्या 4.5फुट उंचीच्या आकर्षक मूर्ती आहेत. या मूर्तीची स्थापना साईकिरण बाबा यांनी केली आहे. ही मूर्ती स्थापना 3 एप्रिल 2009 रोजी रामनवमीच्या मुहूर्तावर करण्यात आली. तसेच गाभाऱ्याच्या खाली प्रशस्त असे ध्यानमंदीर बांधण्यात आले आहे. याठिकाणी आलेले भक्त ध्यान धारणा करून काही क्षणांसाठी मनशांती मिळवितात.

तळबीड–वसंतगड, सरसेनापतींची समाधी व श्रीराम मंदीर बघण्यासाठी येणारे पर्यटक

| महिने | जाने. | फेब्रु. | मार्च | एप्रिल | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टें. | ऑक्टो. | नोव्हें. | डिसें. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पर्यटकसंख्या | 50 | 50 | 30 | 1000 | 10 | 35 | – | 75 | 80 | 25 | 25 | 100 |




सरसेनापती हंम्बीरराव बाजी मोहिते समाधी

प्रभू रामचंद्र मंदीर

जोर्तिलींग व शिर्डी साईबाबा मंदीर

नात्यापेक्षा स्वामीनिष्ठा व स्वराज्याबद्दल प्रेम असावे लागते हे सरसेनापतींनी वेळोवेळी दाखवून दिले आहे. हंबीरराव बाजी मोहिते हे हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेचे एक घटक होते. मराठ्यांच्या इतिहासामध्ये त्यांना महत्त्वाचे स्थान होते. शिवाजी महाराज व संभाजी महाराज या दोघांच्या कारकिर्दीमध्ये अनेक महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्या होत्या. बहिण सोयराबाई व संभाजी यांच्यामध्ये तेढ निर्माण झाल्यानंतर सरसेनापतींनी संभाजी महाराजांची बाजू

घेतली होती व स्वराज्याला मजबूत करण्याचा प्रयत्न केला. शत्रूच्या छातीमध्ये धडकी भरेल असा सेनापतींचा पराकम होता. शिवाजी राजे व संभाजी राजे यांच्या राज्याभिषेकावेळी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्या होत्या.

निष्कर्ष –

1) तळबीड मध्ये असणाऱ्या सरसेनापतींच्या समाधीमुळे, वसंतगड व श्रीराम मंदिरामुळे गावाला पर्यटन स्थळाचा दर्जा मिळेल.

2) पर्यटनस्थळ घोषित केल्यांमुळे येथील वाहतुकीच्या विकासाला गती येईल.

3) पर्यटकांच्या भेटीमुळे गावच्या आर्थिक व सामाजिक विकासाला गती येईल.

4) पर्यटकांना ऐतिहासिक किल्ला, निसर्ग सौंदर्य व एका धार्मिक स्थळाला भेट दिल्याचा आनंद मिळेल.

5) महाबळेश्वर, पाचगणी, कोयना या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांना सलग दोन दिवसांची पर्यटन संधी उपलब्ध केली तर यातून सातारा जिल्हयातील अनेक उपेक्षित पर्यटन स्थळे प्रसिध्दिस येतील व पर्यटनाचा उद्देश साध्य होईल.

संदर्भ ग्रंथ –

श्रीराम मंदिर मुर्ती स्थापना विशेषांक – तळबीड
सरसेनापती हंबीरराव माहिते माहिती पुस्तिका – सी. डी. पवार
https://www.google.search.com
सातारा जिल्हा भूस्थल दर्शक नकाशा 47 ज्ञ/3
सातारा जिल्हा गॅझेटियर
महाराष्ट्राचा भूगोल – डॉ. प्रकाश सावंत